● बीड (महाराष्ट्र) ● वर्ष ४ थे ● अंक ३८ ● शनिवार, दि. १८ मे २०२४ ● RNI-MAHMAR/2021/80074 ● Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ● पान १ ● पाने ४ ● किंमत ३ रूपये
● Beed (Maharashtra) ● Year 4 ● Issue 38 ● Saturday 18, May 2024 ● RNI-MAHMAR/2021/80074 ● Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ● Page 1 ● Pages 4 ● Price 3 Rs.




महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● बीड, परभणी, संभाजीनगर, जालना, लातूर, धाराशिव, हिंगोली, नांदेड, नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

## राज्यात पुढील २४ तासात गारपीटसह मुसळधार पाऊस

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यावर अवकाळी पावसाचे संकट कायम आहे. या अवकाळी पावसामुळे काही भागात रणरणत्या उन्हापासून दिलासा मिळाला असला तरी शेतकऱ्यांचे मात्र, मोठे नुकसान झाले आहे.

या अवकाळी पावसामुळे शेतीपिक संकटात आले आहे. अशात, येत्या २० मेपर्यंत अवकाळी पावसाचं संकट कायम राहणार आहे. तर येत्या २४ तासात राज्यातील काही ठिकाणी मुसळधार पावसासह गारपीट, वादळी वाऱ्याची शक्यता, हवामान विभागातर्फे वर्तवण्यात आली आहे. तर मुंबई, ठाणे, पालघरमध्ये तुरळक ठिकाणी काही तासांसाठी पावसाची रिमझिम पाहायला मिळू शकते.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात पुढील २४ तासात राज्यातील विविध भागात मुसळधार पावसाची शक्यता आहे. तर काही भागात उष्णतेची लाट कायम राहणार आहे. त्यानुसार, सिंधुदुर्ग, अहमदनगर, कोल्हापूर, सांगली, सोलापूर या जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस होऊ शकतो. त्यामुळे या जिल्ह्याला अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर रायगड, रत्नागिरीत तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. यासह आज पुणे, सातारा, जळगाव, नाशिकमध्येही पावसाची शक्यता आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, अकोला, अमरावती, बुलढाणा या जिल्ह्यांमध्येही पावसाची शक्यता आहे. या भागात गारपीट



आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यानुसार, हवामान विभागाने या जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे.

राज्यावर आजपासून पुढील तीन दिवस अवकाळी पावसाचे संकट कायम राहणार आहे. हवामान विभागाने नांदेड, लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. या ठिकाणी ताशी ३०-४० किमी वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे. तर परभणी, बीड, हिंगोली जिल्ह्यांना दोन दिवसांसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. या काळात या ठिकाणी मुसळधार पाऊस होऊ शकतो.




# 'मोदी धार्मिक भावना उत्तेजित करून लोकांत अंतर वाढवत आहेत'

## हे देशासाठी अतिशय गंभीर : शरद पवार



**मुंबई । प्रतिनिधी**

भिवंडी येथे पार पडलेल्या इंडिया आघाडीच्या सभेत शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार टीकास्त्र सोडले. पवार सभेत म्हणाले की, ज्यांच्या हातात देशाची सत्ता आहे, त्यांना पुन्हा संधी मिळाली तर सामान्य जनतेचा मताचा अधिकार संकटात आल्याशिवाय राहणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला संविधान दिले आणि घटनेने आपल्या सर्वांना अधिकार दिला. आज नरेंद्र मोदी आणि त्यांचे सहकारी ठिकठिकाणी सांगत आहेत की, त्यांना ४०० च्या वर जागा हव्या आहेत. का? तर त्यांना घटना बदलायची आहे. कर्नाटकमधला त्यांचा एक खासदार, त्यांनी जाहीरपणे सांगितले की आम्हाला घटना बदलायची आहे. उत्तर प्रदेशचा त्यांचा एक खासदार, राजस्थानमधील त्यांच्या एक महिला नेत्या, यांनी जाहीरपणे सांगितलं की त्यांना घटना बदलायची आहे, त्यासाठी मोदींना मत द्यायचे आहे.

देशात मोदींच्या नेतृत्वात हुकूमशाही

ज्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला अधिकार संकटात आला, त्या दिवशी देशातील कोट्यवधी जनतेच्या अधिकाराचे अस्तित्व नष्ट होईल. त्या दिवशी या देशात मोदींच्या नेतृत्वातील हुकूमशाही सुरू झालेली आपल्याला बघायला मिळेल. हे टाळायचे असेल तर त्यांचा पराभव करणे गरजेचे आहे. आज देशातील शेतकरी, कामगार संकटात आहे. अल्पसंख्याकांची स्थिती अवघड झाली आहे. देशाचा पंतप्रधान जाहिरपणे सांगतो की, ज्यांना जास्त मुले आहेत, ते उद्या तुमच्या घरातील सोने, तुमच्या गळ्यातील मंगळसूत्र काढून घेतील. अशी गोष्ट कदापिही होणार नाही.

आमच्या हातात सत्ता आली तर अयोध्येतील मंदिर संकटात येतील असे सांगत आहेत. या देशातील मंदिरे असो किंवा इतर प्रार्थनास्थळे असो, त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी तुमची आमची सर्वांची आहे. कारण नसताना धार्मिक भावना उत्तेजित करून लोकांत अंतर वाढवण्याचे काम मोदी करत आहे. ही देशाच्या दृष्टीने अतिशय गंभीर गोष्ट आहे असे शरद पवार म्हणाले.

## बीड शहर पोलीस स्टेशन राबवणार ऑपरेशन मनोमिलन

**बीड । प्रतिनिधी**

शहर पोलीस ठाणे येथे शांतता कमिटीचे बैठक झाली. या बैठकीमध्ये संपूर्ण भागामध्ये वाढत असलेला जातीवाद आणि त्यातून सामाजिक विद्वेष यावर काय उपाययोजना करायला पाहिजे यासंदर्भात चर्चा झाली.

यातून बैठकीमध्ये खालील निर्णय घेण्यात आले. सोशल मीडियावर दुसऱ्या जाती बद्दल जो आक्षेपार्य मजकूर लिहिल, त्याची माहिती पोलिसांना दिली जाईल आणि पोलिसांनी त्यावर कारवाई करावी. तसेच मनोमिलनासाठी काम करणाऱ्या नागरिकांना पोलिसांनी बक्षीस द्यावे, प्रोत्साहित करावे. दुसऱ्या जाती बद्दल वाईट वक्तव्य जो कोणी करत आहे, त्यांना फोन करून, प्रत्यक्ष भेटून समज देण्याची सर्वांनी भूमिका ठेवावी. मोठी कीर्तनकार, साधू संत, जातीतील प्रतिष्ठित लोक, डॉक्टर प्राध्यापक, शिक्षक, मोठे अधिकारी, राजकीय व्यक्ती यांना सोशल मीडियावर जातीवाद हा वाईट आहे, समाजासाठी घातक आहे आणि कोणीही दुसऱ्या जातीवर सोशल मीडिया यातून किंवा प्रत्यक्ष चिखल फेक करू नये अशा आशयाचे संवाद प्रसारित करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे....

(उर्वरित पान २ वर)

## दगडफेकप्रकरणी १२ जणांसह अनोळखी १५० जणांवर गुन्हा

**बीड । प्रतिनिधी**

सोशल मीडियावर टाकलेल्या वादग्रस्त पोस्टवरून दोन गटाच्या १०० ते १५० लोकांनी आमने - सामने येत शिवीगाळ व काठ्यांनी मारहाण करीत एकमेकांच्या घरावर तुफान दगडफेक केल्याची घटना नांदूरघाट ( ता. केज) १५ मे रोजी रात्री ८.३० ते ९ वाजेच्या दरम्यान घडली. यानंतर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन परिस्थिती नियंत्रणात आणली होती. याप्रकरणी १२ जणांसह अनोळखी १५० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नांदूरघाट येथे सोशल



मीडियावर टाकलेल्या वादग्रस्त पोस्टवरून दोन गटाच्या लोकांनी एकमेकांना शिवीगाळ व मारहाण केली. या घटनेनंतर आजूबाजूच्या गावांतील लोक गावातील भगवान बाबा चौक ते शिवाजी महाराज चौक दरम्यान असलेल्या रस्त्यावर जमा झाले.

त्यांनी एकमेकांवर तुफान दगडफेक केली. या घटनेची माहिती मिळताच केजचे सहायक पोलिस अधीक्षक कमलेश मिणा, पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन हे पोलीस फोर्स घेऊन गावात दाखल झाले. त्यांनी बळाचा वापर करत जमाव पांगवला.

जमादार उमेश बाबुराव आघाव यांच्या फिर्यादीवरून अमोल सखाराम जाधव, श्रीकांत तुकाराम जाधव, सागर तुकाराम जाधव, शंकर भानुदास जाधव, सुधीर जाधव, प्रदिप जाधव, विलास सुभाष ढाकणे, विनोद बाबासाहेब मोराळे, गोविंद शिवाजी बिक्कड, संपत श्रीहरी मोराळे (सर्व रा. नांदूरघाट), मधुकर सांगळे ( रा. शिरुरघाट ), पांडुरंग खाडे (रा. खाडेवाडी ) या १२ जणांसह अनोळखी १०० ते १५० जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फौजदार वैभव सारंग हे तपास करीत आहेत.

# जरांगेंची प्रकृती बिघडली; दौरा अर्धवट सोडून रुग्णालयात दाखल, उपचार सुरु

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**



मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती अचानक खराब झाली आहे. त्यामुळे त्यांना छत्रपती संभाजीनगरमधील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना तपासून आराम करण्याचा सल्ला दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मंगळवारी आपण त्यासाठी पुन्हा आंदोलन सुरू करणार असल्याचे जाहीर केलं आहे. ४ जूनपासून जालन्यात आमरण उपोषणाला बसणार असून, ८ मे रोजी बीड जिल्ह्यातही मोठा मोर्चा काढणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. मनोज जरांगे पाटील हे बीडमध्ये तब्बल ९०० एकरात जाहीर सभा घेणार होते. ८ जून रोजी त्यांची ही सभा होणार होती. मात्र, भीषण दुष्काळामुळे त्यांची ही सभा रद्द करण्यात आली आहे. त्याचबरोबर जरांगे पाटील यांनी ८ जूनपासून उपोषणाचीही घोषणा केली आहे.

विधानसभा निवडणुकीत २८८ जागांवर उमेदवार उभे करणार- मराठा आणि कुणबी यांच्यात कोणताही भेद नाही, अशा प्रकारे संपूर्ण मराठा समाजाला इतर मागासवर्गीय कोट्याअंतर्गत कुणबी म्हणून आरक्षण मिळण्यास पात्र ठरेल असा कायदा व्हावा, अशी मागणी मराठा कार्यकर्त्यांनी केली आहे. महाराष्ट्रात कुणी ही मराठ्यांची पोटजाती असली तरी त्यांना ओबीसी प्रवर्गात आरक्षण मिळत आहे. महाराष्ट्रात कुणबी ही मराठ्यांची पोटजाती असली तरी त्यांना ओबीसी प्रवर्गात आरक्षण मिळत आहे. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने जानेवारीत जारी केलेल्या प्रारुप अधिसूचनेची अंमलबजावणई करण्याची मागणीही जरांगे-पाटील यांनी केली आहे. राज्य सरकारने मागण्या पूर्ण न केल्यास विधानसभा निवडणुकीत सर्व २८८ जागांवर उमेदवार उभे करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.






# बुद्ध पौर्णिमेच्या दिनी दक्षिण कोरियात साकारला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पहिला पुतळा

## सांस्कृतिक व लोकशाही समन्वयाचा उत्सव केला उत्साहात साजरी ; डॉ.उपगुप्तो महाथेरो यांनी पुतळा उभारणीसाठी केले विशेष प्रयत्न

**बीड । प्रतिनिधी**

कोरियन परंपरेप्रमाणे बुद्ध जन्मदिन १५ मे रोजी साजरी करण्यात येतो (कोरियन लुनार कॅलेंडर नुसार) या दिनाचे औचित्य साधून एका ऐतिहासिक घटनेत दक्षिण कोरिया येथील बुद्ध विहारामध्ये डॉ.बी.आर.आंबेडकर यांचा पहिला पुतळा अनावरण केला आहे. डॉ.बी.आर. आंबेडकर हे एक प्रसिद्ध भारतीय न्यायविद, अर्थशास्त्रज्ञ आणि समाज सुधारक होते. त्यांनी भारतात बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून येओंगप्योंग, सेऊल येथील नवनिर्मित आणि प्रसिद्ध जेड बुद्ध विहारात हा पुतळा अनावरण सोहळा उत्साहात पार पडला. या पुतळा अनावरण सोहळ्यास भारतीय प्रतिनिधीमंडळात लंडन बिझनेस स्कूलचे आयु. नितीन साळवे, नालंदा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, एमएसईबी माजी अधीक्षक अभियंता रवींद्र कोलप, आयु.लक्ष्मण कांबळे (लातूर), माजी नगरसेवक जयकुमार पवार (लातूर), प्रशिक इन्फ्रास्ट्रक्चरचे डायरेक्टर वैभव आदमाने(छत्रपती संभाजीनगर), सेजोंग विद्यापीठातील प्रोफेसर डॉ.पलाश इंगळे,आयु.मनीष वासनिक, कोरिया प्रमुख (एअर इंडिया) मधु वासनिक, दिपाताई रोडे , डॉ.प्रियंका रोडे (बीड) यांचा समावेश होता. अनावरण समारंभाचे नेतृत्व कोरियातील चोंग धाम भंतेजी यांनी केले. दोन्ही कोरियन भंतेनी महा प्रज्ञापारमिता सूत्र आणि बुद्धाच्या आशीर्वादाच्या सूत्रांचे कोरियनमध्ये पठण केले तर डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मुख्य भाषणाचे वाचन नितीन साळवे केले आणि डॉ. जय सुंग सीईओ यांनी अनुवाद केला.

दक्षिण कोरियातील सेऊल पासून ३० कि.मी. अंतरावर आहे. के-पॉप आणि के-ड्रामासारख्या जागतिक सांस्कृतिक निर्यातीसाठी प्रसिद्ध असलेल्या दक्षिण कोरियाने त्यांच्या १७०० वर्षांपूर्वीच्या बौद्ध परंपरांचा आदर केला आहे. ज्याने देशाच्या चारित्र्याला मोठ्या प्रमाणात आकार दिला आहे. डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरण हे भारत आणि कोरिया यांच्यातील कायमस्वरूपी सांस्कृतिक आदान-प्रदानाचे प्रतीक आहे. जे बोधिधर्म होएचो आणि महानंद यांच्यासारख्या प्राचीन विद्वानांपासून सुरू झाले आहे.

पुतळा उभारणीसाठी स्थानिक भारतीय आणि कोरियन समुदायांच्या एकत्रित प्रयत्नांनी आणि दोन्ही बाजूंच्या बौद्ध भिक्षूंनी नेतृत्व केले आहे. जेड बुद्ध विहाराने न केवळ डॉ. आंबेडकरांचा पुतळा उभारण्यास पुढाकार घेतला तर कोरियातील पाहिले भारतीय बुद्ध विहार आणि आंबेडकर संशोधन केंद्राची स्थापना करण्यासाठी ३५०० स्क्वेअर फुट जमीन दानही करण्याचे ठरविले आहे.

भारतीय बाजूने डॉ. उपगुप्तो महाथेरो यांच्या नेतृत्वाखाली येओंगप्योंग, सिओल येथील जेड बुद्ध विहारात भारतीय बौद्ध विहार उभारण्याची आणि त्याच आकाराची जमीन दक्षिण कोरियातील समकक्षांना अजिंठा लेण्यांजवळ धम्मांचल ....

(उर्वरित पान २ वर)

◆ संपादकिय

# मतदानाची टक्केवारी अंतिम करण्याची प्रक्रिया पारदर्शक




भारत निवडणूक आयोगाने झालेल्या मतदानाची टक्केवारी सर्वांना कळावी म्हणून वोटर टर्नआऊट ॲप (Voter Turnout App) तयार केलेले आहे. हे ॲप गुगल प्ले स्टोर (Google Play Store) व ॲपल स्टोर (Apple Store) वर अथवा आयोगाच्या वेबसाईटवर सहज उपलब्ध आहे आणि कोणीही डाऊनलोड करुन त्याचा उपयोग करु शकतो. यावर मतदानाच्या दिवशी सकाळी 9 नंतर दर दोन तासांनी झालेल्या मतदानाची अंदाजित टक्केवारी जाहीर करण्यात येते. मतदानाची प्रत्यक्ष टक्केवारी आणि ॲपवर दिसत असलेली टक्केवारी यामध्ये थोडाफार फरक पडू शकतो, हे स्वाभाविक आहे. या ॲपवर राज्य, लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघ यातील अंदाजित टक्केवारी उपलब्ध होते. हे ॲप डाऊनलोड करुन वापरण्याची लिंक सोबत जोडली आहे.

https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.eci.pollturnout&hl=en_IN

https://apps.apple.com/in/app/voter-turnout-app/id1536366882

दर दोन तासांप्रमाणे मतदानाच्या दिवशी सायंकाळी 5 वाजताची अंदाजित टक्केवारी बघता येते. काही मतदान केंद्रावर संध्याकाळी 6 वाजण्याच्या आत म्हणजे मतदानाची वेळ संपण्याच्या आत मतदान केंद्रांवर दाखल झालेल्या मतदारांना टोकन देऊन सर्वांचे मतदान पूर्ण होईपर्यंत मतदान चालू राहते. काही मतदान केंद्रांवर अगदी रात्री 9 वाजेपर्यंत मतदान चालू असण्याची उदाहरणे आहेत.

मतदान संपल्यानंतर सर्व मतदान पथके विधानसभेच्या मुख्यालय असलेल्या ठिकाणी येवून मतदान यंत्रे, केंद्राध्यक्षांची डायरी व इतर कागदपत्रे सादर करतात. काही मतदान केंद्रे दुर्गम भागात तसेच विधानसभा मुख्यालयापासून दूर असल्यामुळे तेथील मतदान पथकांना मुख्यालयी पोहोचण्यास उशीर होतो किंवा कधी कधी पाऊस अथवा वाहतुकीचा अडथळा यामुळे देखिल उशिर होवू शकतो. पूर्णपणे पोलीस बंदोबस्तामध्ये विधानसभा मुख्यालयात पोहोचल्यानंतर सर्व मतदान यंत्रे सुरक्षिततरित्या क्रमवार एकत्र लावून लोकसभा मतदार संघाच्या मुख्यालय किंवा जिल्हा मुख्यालयामध्ये येण्यासाठी कडक पोलीस बंदोबस्त आणि व्हिडिओच्या निगराणीमध्ये सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार यांना सूचित केल्यानंतरच मतदान यंत्राचा प्रवास चालू होतो. अनेक ठिकाणी मतदान यंत्रे आणि संबंधित कागदपत्रे मतमोजणी केंद्राच्या शेजारी असलेल्या स्ट्राँगरुममध्ये पोहोचायला दुसऱ्या दिवशी सकाळ किंवा अगदी दुपार होते. दरम्यानच्या काळात दूरध्वनी संदेशानुसार घेतलेल्या माहितीच्या अनुषंगाने मतदानाच्या दिवशी मध्यरात्रीपर्यंत पुन्हा एकदा अंदाजित टक्केवारी निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी Encore ह्या भारत निवडणूक आयोगाच्या सॉफ्टवेअरद्वारे वोटर टर्नआऊट ॲप (Voter Turnout App) वर जाहीर करतात. ही जाहीर करण्यात आलेली टक्केवारी "Close of Poll" म्हणजे मतदान संपल्यानंतरची अंदाजित टक्केवारी असते.

केंद्राध्यक्षांची डायरी आणि इतर कागदपत्रांवरुन खात्री करुन जाहीर करण्याची टक्केवारी मतदानाच्या दुसऱ्या दिवशी रात्रीपर्यंत तयार होते आणि लगेचच निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून भारत निवडणूक आयोगाच्या Encore या सॉफ्टवेअरवर भरण्यात येते आणि तीच टक्केवारी वोटर टर्नआऊट ॲप (Voter Turnout App) वर प्रसिध्द करण्यात येते. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी संपूर्ण आकडेवारीची माहिती घेऊन खात्री केल्यावरच त्यावर शिक्कामोर्तब होवून मतदानाची अंतिम टक्केवारी वोटर टर्नआऊट ॲप (Voter Turnout App) वर प्रसारित होते. त्याला "end of poll" अंदाजित टक्केवारी म्हणतात. यासाठी "मतदानाच्या दिवसाच्या दुसऱ्या दिवशी रात्री" ही समय मर्यादा ठरवून देण्यात आलेली आहे.

वोटर टर्नआऊट ॲप (Voter Turnout App) वर मतदानाची अंतिम टक्केवारी सर्व मतदान केंद्रावरील माहिती एकत्र होऊन मतदानाच्या दुसऱ्या दिवशी मध्यरात्री जाहीर होते. ही सर्व टक्केवारी अंदाजित असते. याचे कारण उघड आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर जेव्हा मतदान संपते तेव्हा त्या मतदान केंद्रात झालेल्या मतदानाची संख्या आणि टक्केवारी प्रत्येक मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या राजकीय पक्ष अथवा उमेदवारांच्या प्रतिनिधींकडे केंद्राध्यक्षांच्या स्वाक्षरीनिशी सूपुर्द केलेली असते. प्रत्येक मतदान केंद्रावरील ही संख्या आणि टक्केवारी हा संपूर्ण आकडेवारीचा मूळ आधार असतो. महाराष्ट्र राज्यामध्ये यंदाच्या लोकसभा निवडणुकीसाठी एकूण मतदान केंद्रांची संख्या 98,000 च्या आसपास होती. यावरुन ही आकडेवारी तयार करण्याचे काम किती मोठे आहे याची कल्पना करता येते.

एखादया राजकीय पक्षाने नियुक्ती केलेल्या सर्व मतदान केंद्रांवरच्या प्रतिनिधींकडून केंद्राध्यक्षांच्या स्वाक्षरीनिशी प्राप्त झालेल्या मतदानाची संख्या आणि टक्केवारी याची तुलना केल्यास मतदानाच्या दुसऱ्या दिवशी मध्यरात्री जाहीर झालेल्या टक्केवारीशी निश्चितपणे जुळेल. तरी देखिल वोटर टर्नआऊट ॲप (Voter Turnout App) मध्ये अंतिम टक्केवारीला Approximate असेच म्हटले आहे. त्याचे कारण असे की ही अंतिम टक्केवारी केंद्राध्यक्षांच्या डायरीशी आणि राजकीय अथवा उमेदवारांच्या मतदान केंद्रातील उपस्थित प्रतिनिधींकडे दिलेल्या संख्येशी जुळत असली तरी मतमोजणीच्या दिवशी त्यामध्ये पोस्टल बॅलेट (डाक मतपत्रिका) द्वारे झालेल्या मतदानाची संख्या समाविष्ट केली जाते. त्यामुळे मतदानाची संख्या आणि एकूण टक्केवारी यांच्यात मतमोजणीच्या दिवशी किंचीतशी वाढ दिसून येते. वोटर टर्नआऊट ॲप (Voter Turnout App) वर मतदानाच्या दिवशीच्या दुसऱ्या दिवशी मध्यरात्री दिसणारी अंतिम टक्केवारी ही मतदान यंत्रावरील मतदानाची टक्केवारी असते. त्यामध्ये Election Duty Certificate (EDC) मतदारांनी मतदान यंत्रात केलेल्या मतदानाची संख्या समाविष्ट असते. त्याबाबतची नोंद संबंधित केंद्राध्यक्षांने डायरीत घेवून त्याची माहिती मतदान केंद्रातील प्रतिनिधींना दिलेली असते.

ही सर्व रचना लक्षात घेतल्यास या रचनेमध्ये बारकाईने विचार करुन त्याचे काटेकोर असे कार्यवाहीचे टप्पे भारत निवडणूक आयोगाने गेल्या लोकसभा निवडणूकीपासूनच निश्चित केलेले आहेत. ही पध्दत आता चांगली प्रस्थापित झालेली असून पारदर्शकतेचे उत्तम उदाहरण आहे.

मतदानाच्या टक्केवारीत होणारे बदल याबाबत चर्चा करताना सर्वांनी ही प्रक्रिया नीट समजावून घेणे आवश्यक आहे. अन्यथा गैरसमज अथवा अफवा पसरु शकते आणि उपयुक्त तंत्रज्ञानाची सुविधा आपल्या सगळयांच्या हाती असूनही तिचा सुयोग्य उपयोग होत नाही, अशी परिस्थिती होऊ शकते.

- डॉ.किरण कुलकर्णी,
अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य.

# देशातील दुसरा सर्वाधिक लांबीचा महामार्ग,

## ३५ तासांचा रस्ता १८ तासांत पूर्ण होणार, महाराष्ट्रालाही फायदा होणार



देशातील सर्वात मोठा एक्स्प्रेस वे दिल्ली ते मुंबई दरम्यान तयार होतोय हे तर तुम्हाला माहितीच आहे. पण तुम्हाला माहितीये का देशातील दुसरा सर्वात मोठा एक्स्प्रेस वे कोणता आहे व तो कोणत्या शहरांतून जातो.

देशातील दुसरा सर्वात मोठा एक्स्प्रेस वे सूरत-चेन्नई एक्स्प्रेसवे आहे. याची एकूण लांबी १,२७१ किलोमीटर इतकी आहे. तर, दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवेची एकूण लांबी १,३५० किलोमीटर इतकी आहे. हा एक्स्प्रेसने चेन्नईला सूरतसोबत जोडणार आहे. तसंच, यामुळं पश्चिम घाटातूनही नागरिक प्रवास करु शकतात. नवीन एक्स्प्रेसवे २ वर्षांत पूर्ण होणार आहे. यामुळं दोन्ही शहरांतील अंतर कमी होणार आहे.

नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया (छक्कख)कडे या एक्स्प्रेसचे काम पाहत आहे. या महामार्गावर १२० किलोमीटर प्रती तास इतकी वेगमर्यादा ठेवण्यात आली आहे. एक्स्प्रेसवेसाठी जवळपास ५० कोटींचा निधी खर्च होण्याची शक्यता आहे. तर, हा महामार्ग सुरू झाल्यानंतर जवळपास ५० हजार गाड्यांइतकी वाहतुककोंडी रस्त्यावर कमी होणार आहे. सध्या तरी ४ लेनमध्ये हा महामार्ग बनवण्यात येत आहे. भविष्यात तो वाढवून ६ किंवा ८ लेन केले जाणार आहे.

चेन्नई आणि सूरत दरम्यान तयार होणाऱ्या एक्स्प्रेसवेमुळं दोन्ही शहरातील अंतर १,६०० किमीने घटून १,२७० किमी इतके होणार आहे. सध्या या दोन शहरांतील अंतर रस्तेमार्गे ३५ तास इतके आहे. तर, नवीन एक्स्प्रेसवेने हेच अंतर अर्ध्यापर्यंत येणार असून फक्त १८ तासांवर येणार आहे. हा महामार्ग ६ मोठ्या राज्यांतून जाणार आहे. ज्यात गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक,आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि तामिळनाडू यांचा समावेश आहे. या राज्यातील अनेक शहरांना या महामार्गाचा फायदा होणार आहे. जसं की, तिरुपती, कडप्पा,कुरनूल, कलबुर्गी, सोलापुर, अहमदनगर आणि नाशिक या शहरांना याचा फायदा होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भारतमाला परियोजनाअंतर्गत चेन्नई-सूरत मोटारवे योजनेचे उद्घाटन ऑक्टोबर २०२१मध्ये करण्यात आले होते. हा मार्ग पूर्ण करण्याची डेडलाइन डिसेंबर २०२५ ठेवण्यात आली आहे. एकदा का हा महामार्ग तयार झाला की दक्षिण भारताला पश्चिम भारतासोबत थेट जोडता येणार आहे. गुजरातमधील सुरत हे शहर कपड्याची बाजारपेठ म्हणून ओळखलं जातं. तर, चेन्नई आयटीसह अन्य इंडस्ट्रीसाठी ओळखलं जातं. या नवीन एक्स्प्रेस वेमुळं दोन्ही शहरांमध्ये व्यापार वाढेल. त्याचबरोबर इंडस्ट्रियल कॉरिडोरदेखील विकासीत होणार. इतकंच नव्हे तर, या नव्या महामार्गालगत रियर इस्टेटदेखील डेव्हलप होणार आहे.


◆ पान ४ वरून पुढे


## घाटकोपरच्या दुर्घटनेतुन बीड नगरपालिका ...

लिंबागणेशकर यांनी व्यक्त करत कायमस्वरूपी कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

बीड शहरातील अनधिकृत होर्डिंग्जची ठिकाणे

बीड शहरातील बंजारा हाँटेल, एसपी आफिस समोर,सारडा कपिटल कार्नर ,सेंन्ट अन्स स्कुलसमोर,शिवराज पान सेंटरच्या वर,केएसके कालेज समोर,नगरनाका महाराष्ट्र ग्रामीण बँकेसमोर,बंब सर्कल हिरालाल चौक, अक्षरधाम, बीड पंचायत समिती समोर,बालेपीर, बार्शी नाका चौक,जुने मारूती शोरूम,इंडीयन आईल पेट्रोल पंप बार्शी रोड, मुक्ता लान्स अशा विविध ठिकाणी १०० पेक्षा जास्त ठिकाणी अनाधिकृत होर्डिंग्ज लावण्यात आलेली आहेत.तसेच बीड शहरातील महत्त्वाचे चौक, दुभाजक याठिकाणी लहानमोठे अनाधिकृत होर्डिंग्ज लावण्यात आलेले असुन ते अपघाताला निमंत्रण देत आहेत.

न्यायालयाच्या आदेशाचा आणि दाखल शपथपत्र यांचा नीता अंधारे मुख्याधिकारी नगरषरीषद यांच्या कडुन अवमान : डॉ.गणेश ढवळे - बेकायदा होर्डिंग्ज,बनर, पोस्टर्स ,कमानी व जाहिराती हटवण्यासाठी काय पावले उचलण्यात आली याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारसह राज्यातील महापालिका आणि नगरषरीषदसह सर्वच नागरी संस्थांना दिलेले आहेत .सन २०१७ च्या निकालात मुंबई उच्च न्यायालयाने हे मान्य केले आहे की बेकायदेशीर होर्डिंग्ज वर कारवाई करणे तसेच गुन्हेगारांविरूद्ध गुन्हेगारी कायद्याची अंमलबजावणी करताना राजकीय वर्गाच्या सहभागामुळे महापालिका अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांचे काम खुप कठीण होताना दिसत आहे.मात्र असे असताना बेकायदेशीर होर्डिंग्ज, बनर,कमानी व अशा प्रकारच्या आकाश चिन्हांच्या माध्यमातून शहराचे होणारे विद्रुपीकरण थांबवावे अशी उच्च न्यायालयाची इच्छा असल्याने सन २०२२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि राज्यातील सर्वच नागरी संस्थांना कारवाईचे निर्देश दिलेले आहेत.

ज्यात महापालिका आणि नगरपरीषदांचा समावेश आहे.बेकायदेशीर होर्डिंग्ज,बनर , पोस्टर्स, कमानी काढुन टाकण्यासाठी केलेल्या उपाय योजनांचा अहवाल सादर करा तसेच बेकायदा होर्डिंग्जची यादी आणि कायदेशीर होर्डिंग्ज मधुन किती महसूल मिळतो याची माहिती असलेले प्रतिज्ञापत्र दाखल करा असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले होते.न्यायालयाचे आदेश असतानाही संबंधित यंत्रणा अंमलबजावणी करत नसुन कर्तव्यात कसूर करत असल्याचे दिसून येते.बीड नगरपालिकेचे तत्कालीन मुख्याधिकारी उमेश ढाकणे यांनी जुन २०२२ मध्ये शपथपत्र दाखल केले होते.मात्र तरीही अद्याप अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणात कारवाई झाल्याचे दिसून येत नाही.व्यावसायिक जाहिरात दारांनी शहराचे मोठ्या प्रमाणावर विद्रुपीकरण केले असून सामाजिक कार्यकर्ते यांच्या तक्रारीनंतर कारवाई तर सोडाच साधे होर्डिंग्ज हटवण्याची तसदी सुद्धा नगरपरिषद प्रशासन घेताना दिसत नाही.

चमकोगिरी करणाऱ्यांच्या वाढदिवसाच्या आणि शुभेच्छा होर्डिंग्ज मुळे वाहतुकीस अडथळा,अपघाताला निमंत्रण- बीड शहरात चमकोगिरी करणारांची मोठ्या प्रमाणावर खोगीरभरती असुन शहरातील मुख्य चौक मुख्य रस्त्यांवरही जयंती,उत्सव ,सण, आंदोलने, वाढदिवस आदी कार्यक्रमांचे सर्रास बनर लावले जातात. तसेच मुख्य रस्त्यांवरील दुभाजकांमध्येही बनर उभे केले जातात. अनेकदा हेच बनर हवेने खाली पडुन अपघात घडल्याच्या घटना घडलेल्या आहेत.याचा फटका सर्वसामान्यांना , वाहनधारकांना बसतो.त्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो.नगरपालिकेने विशेष मोहीम राबवुन अनाधिकृत बनर लागणार नाहीत याची काळजी घेणं आवश्यक आहे.मात्र नगर पालिका जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.

## कौशल्य विकास उद्योजक्ता प्रशिक्षणासाठी अर्ज ...

आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याच्या तपशिल सादर करावा. वरील अटी शर्ती नुसार संस्था चालकाने ३१ मे २०२४ पर्यंत प्रशिक्षण संस्थेने प्रस्ताव दोन प्रतीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहासमोर नगर रोड बीड जिल्हा कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत सकाळी ०९:४५ ते संध्याकाळी ०६:१५ पर्यंत सादर करावेत. दि. ३१ मे २०२४ नंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाही यांची संबधितानी नोंद घ्यावी. असे आवाहन साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थपाक यांनी केले आहे.

## युवकांनी सलोखा , बंधुत्व संबंध जोपासण्याची गरज...

केलेला दिसून आला त्यावेळी उमेदवारांच्या समर्थकांकडून त्यांच्या उमेदवारांनी केलेला संघर्ष, उमेदवारांनी दिलेली आश्वासन, उमेदवारांनी केलेली विकासकामे आशा पोस्ट करत एक प्रकारे समाज माध्यमांवर देखील प्रचाराची रणधुमाळी रंगलेली पाहायला मिळाली होती.

निवडणुका काळ समाप्त झाल्यानंतर देखील कार्यकर्त्यांनी तसेच चाहत्यांनी आपल्या उमेदवारांची ऐकलहाती बाजू लावून धरलेली पाहायला मिळत आहे त्यामुळे अनेक ठिकाणी शहरात तसेच गावांमध्ये तणावाचे वातावरण मागच्या काही दिवसापासून निर्माण होऊ लागले पहायला मिळत आहे या तणावाच्या वातावरणामुळे समाजा समाजात दूही निर्माण होण्याचे संकेत दिसत आहेत. अशा पद्धतीची दुफळी दोन समाजात निर्माण होऊ नये ,तसेच समाज माध्यमांवर केलेल्या पोस्टमुळे कोणत्याही समाजाची मने दु:खावली जाऊ नये यासाठी सर्व युवकांनी सलोखा, बंधुत्व संबंध जोपासावे तसेच समाज माध्यमांवरील विषमतेच्या मजकुरांना कोठेही थारा देऊ नये असे आवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष सुभाष (भाऊ) राऊत यांनी केले आहे.

## गौण खनिज अधिकारी माधव काळे यांचा...

विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना दि.०३/०४/२०२४ रोजी पत्र काढून दि. २६/०४/२०२४ पूर्वी ७ दिवस अगोदर दोन प्रतीत अहवाल सादर करावा. आसे कळविण्यात आले .त्यानंतर जिल्हाधिकारी बीड यांनी दि. ०४/२०२४ रोजीचा ईमेल दि. २२/०४/२०२४ रोजी विभागीय आयुक्त यांना आहवाल पाठवला.

त्यानंतर विभागीय आयुक्त यांनी दि. २६/०४/२०२४ रोजी उपआयुक्त महसुल विभागीय आयुक्त यांनी मा. लोकायुक्त मुंबई यांना अहवाल सादर केला आहे. तसेच दि. २६/०४/२०२४ रोजी विभागीय उपायुक्त यांनी जिल्हाधिकारी बीड यांना माधव काळे यांच्याविरुद्ध दाखल तक्रारी व गुन्हे दाखल आहेत काय याबाबत २ दिवसात वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा याबाबत पत्रव्यवहार केला. त्यानंतर दि. ०२/०५/२०२४ रोजी पुन्हा स्मरणपत्र १ काढले त्यानंतर शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दि.०३/०५/२०२४ रोजी माधव काळे यांच्याविरुद्ध दोन प्रकरणे दाखल आहेत आसे लेखी उपायुक्त विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांना कळविण्यात आले.

त्यानंतर अशोक कातखडे सामाजिक कार्यकर्त यांनी दि.०८/०५/२०२४ रोजी माधव काळे यांच्याविरुद्ध दाखल प्रकरणाचे सर्व पुराव्यासह कागदपत्र ईमेल वर व नोंदणीकृत डाकेने मा.लोकायुक्त मुंबई व विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांना पाठविण्यात आले. त्यानंतर दि.१५/०५/२०२४ रोजी मा.विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांनी गंभीर दखल घेऊन जिल्हाधिकारी बीड यांना माधव काळे गौण खनिज खनिकर्म अधिकारी यांना पदावरून तात्काळ कार्यमुक्त करावे आसे आदेश पारित केले आहे. या प्रकरणात माधव काळे यांची जिल्हा गौण खनिज खनिकर्म अधिकरी पदी बेकायदेशी पणे नियुक्ती करणारे जबाबदार शासन सेवेत कार्यरत आसणारे अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगांची कारवाई करण्यात यावी. अन्यथा श्री.अशोक कातखडे हे मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल करण्याचा हक्क राखीव ठेवत आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.


◆ पान १ वरून पुढे


## बीड शहर पोलीस स्टेशन राबवणार ऑपरेशन मनोमिलन




सोशल मीडियावर येणाऱ्या वाईट पोस्ट या डिलीट करण्यात याव्यात. गावोगाव गाव भेटी देण्यात याव्या आणि गाव भेटीतून तरुणांना विषारी आणि विद्वेषक जातीवाद हा समाजाला कसा घातक आहे पुढील येणाऱ्या आणि चालू पिढींना तो किती धोकादायक आहे हे पटवून देण्यात यावे. जास्तीत जास्त वाईट पोस्ट या रात्री उशिराने येत असून, बरेच लोक नशेमध्ये वाईट पोस्ट करतात. अशा पोस्ट कडे लोकांनी दुर्लक्ष करावे आणि अशा पोस्ट करणाऱ्यांना चव्हाट्यावर आणावे त्याला समज द्यावी. ग्रुप डमिन ने लक्ष ठेवावे आणि त्याच्या अप्रोहल शिवाय कोणीही पोस्ट टाकणार नाही अशी सेटिंग ग्रूप ल करून घ्यावी. प्रत्येक जातीतील लोकांनी आपल्या जातीतील मोठ्या नेत्यावर जातीय विद्वेष तयार, हिनवणारी भावना तयार होईल अशी वक्तव्य करू नये. यासाठी मनधरणी करावी. असे मुद्दे सर्व स्तरातून सर्व सदस्याकडून मांडण्यात आले आणि त्यावरअशा प्रकारची कार्यक्रम राबवून सर्वांनी ऑपरेशन मनोमिलन याची अंमलबजावणी करण्यासाठी वरील मुद्द्यावर काम करावे यासाठी एक मत झाले.

## बुद्ध पौर्णिमेच्या दिनी दक्षिण कोरियात साकारला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पहिला पुतळा

कोरियन बौद्ध विहार उभारण्यासाठी दान करण्याची प्रतिबद्धता आहे. ज्यामुळे दोन्ही देशांमधील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक बंध अधिक दृढ होतील.

भारतीय बुद्ध विहाराची स्थापना आणि जमीन दान यांना दोन राष्ट्रांमधील सेतू म्हणून पाहिले जाते जे परस्पर समज आणि सहकार्याला प्रोत्साहन देते. प्रतिसादात्मक हालचालीत, भारतीय बाजूने अजिंठा लेण्यांजवळ एका कोरियन बुद्ध विहारासाठी जमीन दान करण्याचे वचन दिले आहे, ज्यामुळे दोन्ही देशांमधील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक बंध अधिक मजबूत होतील.

अनावरण सोहळ्याला दोन्ही देशांतील मान्यवर आणि व्यावसायिक नेते उपस्थित होते. ज्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या समाजाला दिलेल्या योगदानाबद्दल चा आदर आणि प्रशंसा प्रतिबिंबित झाली होती.

दक्षिण कोरिया येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा उभारणीसाठी लंडन बिझनेस स्कूलचे आयु.नितीन साळवे यांनी अथक परिश्रम घेतले.

मराठवाडा पत्र
# आपला महाराष्ट्र


● शनिवार, दि. १८ मे २०२४

# पारगाव सिरस येथे बैलगाडी शर्यतीमध्ये आली रंगत

▸ **शेकडो शेतकऱ्यांनी घेतला स्पर्धेमध्ये सहभाग**

**बीड । प्रतिनिधी**







बीड तालुक्यातील मौजे पारगाव सिरस येथे श्री. भैरवनाथ यात्रेनिमित्त भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन सरपंच दिनकर जमदाडे यांच्या वतीने करण्यात आले होते. या स्पर्धे साठी जिल्ह्यासह राज्यभरातून शेतकर्यांनी आपल्या बैलगाडी सह सहभाग नोंदवला. या स्पर्धे ची तयारी करत बीड तालुका व परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या बैलाचा सराव करून घेऊन, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या बैलासोबत सपर्धा केली. पूर्वी बीड जिल्ह्यामध्ये अशा स्पर्धा कमी प्रमाणात होयच्या परंतु पश्चिम महाराष्ट्राला लाजवेल अशा स्पर्धेचे आयोजन बीड जिल्ह्यातील हौशी शेतकरी बांधव आपल्या ग्रामदैवताच्या यात्रेनिमित्त करत आहेत.

या स्पर्धेमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग व उत्साह मोठ्या प्रमाणात होता. बैलगाडी किंवा बैलगाडा हा ग्रामीण भागामध्ये हौशीचा विषय झाला आहे. पूर्वी बैल हा शेतीकामासाठी त्याचा वापर होयचा. परंतु आता बैलगाडी शर्यतीमध्ये आपला बैल स्पर्धेत टिकावा यासाठी पोटच्या मुलाप्रमाणे शेतकरी त्याच्यावर प्रेम दाखवत आहेत. बीड जिल्ह्यामध्ये देखील पश्चिम महाराष्ट्रा सारख्या स्पर्धा होव्यात यासाठी सर्वात अगोदर पुढाकार घेणारे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी गेल्या दोन वर्षापासून उत्कृष्ट असे बैलगाडा शर्यतीचे आयोजन करत आहेत.

बीड विधानसभा मतदारसंघातील मौजे पारगाव (सि) येथे ग्रामदैवत भैरवनाथ यात्रेनिमित्त भव्य भैरवनाथ केसरी (२०२४) बैलगाडी शर्यत आयोजित केली होती. या शर्यतीचा शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या प्रमुख उपस्थित आज संपन्न झाला. या स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यासह तालुक्यातील व परिसरातील शेतकरी बांधव, बैलगाडा प्रेमीची मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी राजांचा रांगडा खेळ असलेल्या बैलगाडी शर्यतीने शेतकरी मित्रांचे पशूधनावर असलेले प्रेम अनुभवास मिळाले. स्पर्धा या अतिशय उत्सहात संपन्न झाल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

# बुलढाणा : श्री संस्थानच्या आवारातील वटवृक्ष कोसळला



**शेगाव । प्रतिनिधी**

विदर्भ पंढरी असलेल्या श्री गजानन महाराज संस्थानचे परिसरातील ३० वर्षे जुने वडाचे झाड वादळी वाऱ्यामुळे गुरुवारी सायंकाळी मुळासकट उन्मळून पडले. मात्र, कुठलीही जीवितहानी झाली नाही. गुरुवारी सायंकाळी शहरात सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस आला. वाऱ्याच्या झोतात श्री गजानन महाराज मंदिर परिसरात इमारतीला लागून असलेले ३० वर्षे जुने वडाचे झाड मुळासकट कोसळले. दर गुरुवारी सायंकाळी या वडाच्या बाजूलाच काही फूट अंतरावर श्रींची पालखी दर्शनार्थ ठेवलेली असते. यावेळीही पालखी यास्थळी होती. त्यामुळे भाविकांची गर्दी होती. या ठिकाणी उपस्थित भाविक काही क्षणातच आजूबाजूला आडोशाला गेले. वटवृक्ष कोसळत असताना अनेकांची धावपळही झाली. काहींनी श्रींचा जयघोष केला.

# विक्रीसाठी गावठी पिस्तूल घेऊन फिरले; पोलिसांनी सापळा रचून दोघांना पकडले

**वसमत । प्रतिनिधी**

गावठी पिस्तूल व काडतूस अवैधरित्या विक्रीसाठी घेऊन फिरणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले. त्यांच्याकडून एक गावठी पिस्तूल व एक जिवंत काडतूस जप्त केले. ही कारवाई वसमत तालुक्यातील पळसगाव पाटी जवळ १७ मे रोजी केली. या प्रकरणी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला.

पवन माणिकराव डाखोरे (रा. पळसगाव ता. वसमत), गणेश डिगांबर गुंडाळे (रा. रूपला पांढरी ता. पूर्णा ह.मु. पाटीलनगर वसमत) अशी आरोपींची नावे आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे यांचे पथक वसमत तालुक्यात गस्त घालत होते. यावेळी तालुक्यातील पळसगाव पाटी येथे दोघेजण गावठी पिस्तूल विक्रीसाठी थांबले असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यावरून पथकाने पळसगाव पाटी गाठून पवन डाखोरे व गणेश गुंडाळे यांना ताब्यात घेतले. यावेळी गणेश गुंडाळे यांच्या मदतीने पिस्तूल व काडतूस विक्रीसाठी जवळ बाळगल्याचे पवन डाखोरे यांने पोलिसांना सांगितले. त्याने कमरेला लावलेले एक गावठी पिस्तूल व बॅरेलमधील एक जिवंत काडतूस असा ४२ हजारांचा मुद्देमाल काढून दिला. या प्रकरणी दोघांविरूद्ध वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला.



### ●दरोड्याचे दोन गुन्हे दाखल

**यातील पवन डाखोरे याचेवर नांदेड जिल्ह्यात दरोड्याचे दोन गुन्हे दाखल असून तो रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलिस अधीक्षक जी. श्रीधर, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे, पोलिस अंमलदार पांडुरंग राठोड, नितीन गोरे, आकाश टापरे, आजम प्यारेवाले, नरेंद्र साळवे, हरिभाऊ गुंजकर, प्रशांत वाघमारे यांच्या पथकाने केली.**

## वडिलांच्या अंगावर गरम तेल टाकणाऱ्या मुलीस कारावास

**अकोला । प्रतिनिधी**

अकोला - बाळापुर तालुक्यातील मानकी येथील रहिवासी असलेल्या एका मुलीने वडिलांच्या अंगावर गरम तेल ओतल्याने वडील गंभीर जखमी झाले होते. या प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी मुलगी प्रतीभा पांडे हीला दोन वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.प्रतीभा गणेश पांडे हीचे पतीसोबत पटत नसल्याने ती माहेरी वडीलांकडे राहत होती. घर बांधण्याच्या कारणावरुन वडील महादेव सिताराम सोनोने व मुलगी प्रतीभा पांडे यांचे वाद होत असायचे. अशातच २२ फेब्रुवारी २०२२ रोजी त्यांच्यातील वाद विकोपाला गेल्याने मुलीने सोयाबीनचे तेल गरम करून वडील झोपलेले असतांना त्यांच्या अंगावर ओतले. यामध्ये गंभीररीत्या भाजलेल्या महादेव सोनोने यांना ग्रामस्थांनी तातडीने रुग्णालयात दाखल केले.

बाळापूर पोलिसांनी प्रतीभा पांडे हीच्याविरुध्द भारतीय दंड विधानाच्या कलम ३२४ अन्वये गुन्हा दाखल केला.

## मुंबई उत्तर पूर्व मतदारसंघात नियंत्रण कक्ष

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुंबई उपनगरमध्ये २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. २८ - मुंबई उत्तर पूर्व लोकसभा मतदारसंघात नागरिकांना आणि उमेदवारांना निवडणुकीसंदर्भात काही समस्या अथवा तक्रार असल्यास त्यांनी नियंत्रण कक्षातील ०२२-२०८५२६८९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. दादाराव दातकर यांनी केले आहे. २८ मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघात १५५ - मुलुंड, १५६ - विक्रोळी, १५७ - भांडूप पश्चिम, १६९ - घाटकोपर पश्चिम, १७० - घाटकोपर पूर्व, १७१ - मानखुर्द, शिवाजीनगर या विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. ज्येष्ठ आणि दिव्यांगांसह मतदारांना सुलभरित्या मतदान करता यावे, यासाठी सर्व यंत्रणा सज्ज आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी हा नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला असल्याचेही निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. दातकर यांनी सांगितले.

# संत बंकटस्वामी महाराज यांच्या भव्य पालखी मिरवणुकीने पुण्यतिथी उत्सवाची थाटात सुरुवात

## शोभा यात्रा आणि भव्य पालखी मिरवणुक डोळ्याचे पारणे फेडणारा सोहळा

**नेकनूर । प्रतिनिधी**

भव्य पालखी शोभायात्रा हजारो कलशधारी महिला, शेकडो बाल वारकरी टाळ मृदंगाच्या जयघोषात श्रीक्षेत्र नेकनूर येथे बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवाची मोठ्या थाटात सुरुवात झाली.संत महंतांच्या हस्ते टाळ, विना, मृदंग, पालखी आणि ग्रंथ पुजन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत महादेव महाराज चाकरवाडीकर,श्री ह भ प महंत हरिहर भारती महाराज,श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे , श्री ह भ प महादेव आनंद भारती. श्री ह भ प तुकाराम महाराज भारती, सत्यवान महाराज लाटे, नाना महाराज कदम सुरेश म जाधव, श्रीकृष्ण महाराज यादव, वसंत महाराज शिंदे यांच्या सह हजारो भावीक भक्त मंडळी उपस्थीत होतें.



बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र नेकनुर येथे वै.श्रीगुरू बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवाची सुरुवात शुक्रवारी सकाळी मोठ्या थाटात सुरुवात झाली.. यावर्षी नव्याने अभिनव उपक्रम घेत शोभा यात्राव भव्य पालखी मिरवणूक सकाळी ८ वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिर शिक्षक कॉलनी ते कीर्तन मंडप या ठिकाणी करण्यात आले यावेळी पिवळ्या रंगाच्या आणि भगव्या रंगाच्या साड्या परिधान करून कलशधारी १००० सुवासिनी महिला , कुमारीका मुली सहभागी झाल्या होत्या. बंकटस्वामी वारकरी शिक्षण संस्थेतील बालवारकरी याच्या पाऊलीच्या खेळाने लक्ष वेधून घेतले.

**संत बंकटस्वामी महाराज संस्थान वर १२० २०० फुटाचा तब्बल २४ हजार स्कवेअर फुटाच्या भव्य किर्तन भवनाचे बांधकाम प्रगती पथावर आहे. महादेव महाराज चाकरवाडीकर,श्री ह भ प महंत हरिहर भारती महाराज,श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे , श्री ह भ प महादेवानंद भारती. श्री ह भ प तुकाराम महाराज भारती, यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न झाले यावेळी जोग महाराज वारकरी कीर्तनभवनाने बंकटस्वामींच्या आध्यात्मिक वैभवात भर पडेल असा विश्वास महादेव महाराज तात्या यांनी व्यक्त केला.**

## शिरूर येथे पहिल्या एकता बालकुमार संस्कार शिबीराचे उद्घाटन

**शिरूर । प्रतिनिधी**




एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आणि श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थान शिरूर कासार यांच्या संयुक्त विद्यमाने सिद्धेश्वर मंदिराच्या प्रांगणात कालपासून पहिल्या एकता बालकुमार संस्कार शिबीराला सुरूवात झाली असून श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. सकाळी ६ ते १० व सायंकाळी ५ ते ७ या वेळेत पाच दिवस सदरील शिबिर संपन्न होणार आहे. १५ ते १९ मे दरम्यान पार पडणाऱ्या या शिबिरात पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जाणार असल्याची माहिती एकता फाउंडेशन च्या पदाधिकाऱ्यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली. दैनंदिन कार्यक्रमात सकाळी ६ ते ७:३० योग प्राणायाम त्यानंतर ८ ते ८:३० गीतापाठ, ८:३० ते ९ हस्तकला, ९ ते ९:३० बोधकथा, ९:३० ते १० सुगम संगीत असे कार्यक्रम होणार आहेत. सायंकाळी ५ ते ६ या वेळेत मैदानी खेळ, ६ ते ६:३० नृत्य कार्यशाळा आणि ६:३० ते ७ या वेळेत विविध विषयांवर मुक्तसंवाद होणार आहे. शिरूर आणि पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांनी या बालकुमार संस्कार शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन एकता फाउंडेशनच्या वतीने संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, सचिव पत्रकार गोकुळ पवार, उपाध्यक्ष नितीन कैतके, मिरा दगडखैर, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, सहसचिव लखुळ मुळे, महिला आघाडी प्रमुख रंजना फुंदे, सल्लागार ॲड.भाग्यश्री ढाकणे, संस्थापक सदस्य राजेश बीडकर, कैलास तुपे, दिपक महाले, देविदास शिंदे, पु.ना.बारडकर, प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, महादेव राऊत, डॉ.शोभा सानप, फौजी कैलास खेडकर, मल्हारी खेडकर, हरिप्रसाद गाडेकर यांनी केले आहे.

# खरीप हंगाम पेरणीपूर्व मशागतीसाठी शेतकऱ्यांची लगबग

**नांदेड । प्रतिनिधी**

खरीप हंगामाच्या पेरणीपूर्व मशागतीसाठी शेतक-यांची लगबग सुरू असून, त्यात अवकाळीचे विघ्न येत आहे. मे महिना अर्धा संपला असल्याने आता मृग नक्षत्राच्या पेरणीसाठी शेतकरी शेतजमिनीची नांगरणी, वखरणी करण्यात व्यस्त झाले आहेत. दुसरीकडे कोणत्या कंपन्यांचे बियाणे चांगले राहिल, याची चाचपणीही मोंढा मार्केटमध्ये करताना दिसून येत आहे. यंदा खरीप हंगामात तब्बल ७ लाख ७४ हजार ३३६ हेक्टर क्षेत्रावर पेरणी करण्यात येणार आहे. यात ४ लाख ५२ हजार हेक्टर सोयाबीनसाठी तर २ लाख १०५०० हेक्टर कापूस पिकासाठी प्रस्तावित केले आहे.

यंदा पाऊस कसा राहणार, यावर खरिपाच्या पेरणीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. सध्या अवकाळी पाऊस पडत असला तरी मृग नक्षत्रावर पाऊस वेळेवर पडणे गरजेचे आहे. यंदा खत, बियाण्यांच्या दरामध्ये काही प्रमाणात वाढ झालेली आहे. पेरणीसाठी वेळेवर खत, बियाणे कसे उपलब्ध होईल, यासाठी शेतकऱ्यांचेही आर्थिक नियोजन सुरू आहे.



**सोयाबीनसाठी साडेसहा लाख हेक्टर**

जिल्ह्यात खरीप हंगामासाठी पावणे आठ लाख हेक्टर क्षेत्र प्रस्तावित केले असले, तरी यात सर्वाधिक साडेसहा लाख हेक्टरमध्ये सोयाबीन व कापसाची तर अन्य क्षेत्रावर इतर पिकांची पेरणी होईल. यावर्षी सोयाबीनचे क्षेत्र स्थिर राहिल, कापसाचे प्रस्तावित क्षेत्र पाच टक्क्यांनी वाढले आहे.

**दोन लाख मे. टन खत लागणार-** खरीप हंगामासाठी २ लाख ६०० मेट्रिक टन रासायनिक खताची मागणी करण्यात आली आहे. त्यात युरिया ५३ हजार ९०० मे.टन, डीएपी ३३ हजार ३०० टन, एमओपी ८ हजार टन, एचपीके ७९ हजार ८०० मे.टन, एसएसपी २५६०० टन असे एकूण २ लाख ६०० मेट्रिक टनाचा समावेश आहे.

**असे आहे खताचे नियोजन**

एप्रिल महिन्यात १२ हजार २२३ मे.टन, मे महिन्यात २६७६४ मे.टन, जून ५३ हजार ९९ टन, जुलै ४५,७८२ टन, ऑगस्ट ३७,९८४ मे.टन, तर सप्टेंबर महिन्यात २५,३४८ मेट्रिक टन रासायनिक खताचे नियोजन केले आहे.

**साडेदहा लाख पाकिटांची मागणी, उपलब्ध झाले ६५ हजार**

कापसाच्या १ लाख ५२ हजार ५०० पाकिटांची मागणी केली असून बुधवारपर्यंत जिल्ह्यात ६५ हजार कापसाची पाकिटे उपलब्ध झाली आहेत. तर ज्वारी ९७५ क्विंटल, भात २१९ क्विंटल, तूर ३४९१ क्विंटल, मूग ५०३ क्विंटल, उडीद ७६१ क्विंटल, मका १५१ क्विंटल, तीळ ६ क्विंटल, तर सोयाबीन १ लाख १८ हजार ६५० क्विंटल बियाणे लागेल. यापैकी सोयाबीनेच ५२ हजार क्विंटल बियाणे उपलब्ध झाले आहे.

मराठवाडा पत्र
# आपला जिल्हा बीड

• पान ४

• शनिवार, दि. १८ मे २०२४

## ◆ थोडक्यात

### कीड रोग व्यवस्थापन पुस्तकेत सुधारणा कळविण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

कृषी विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत भरडधान्य, पौष्टिक तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य पिकांचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढविण्यास शिफारशी ही पुस्तिका तयार करण्याचे काम सुरू आहे. सदर पुस्तिकेमध्ये भरडधान्य, पौष्टिक तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य पिकांचे पेरणीपासून काढणी पर्यंतचे लागवड तंत्रज्ञान, कीड रोग व्यवस्थापन या विषयी माहिती देण्यात आली आहे. सदर पुस्तिकेच्या Draft चा क्यु आर कोड सोबत देण्यात येत आहे. या पुस्तिकेमध्ये काही सुधारणा तसेच अतिरिक्त माहिती द्यावयाची असल्यास कृषी आयुक्तालयाच्या ddinforgmail.com या मेलवर कळविण्यात यावे .असे कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुण्याचे, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### शेतक-यांनी 1 जून पूर्वी कापसाची लागवड करु नये

**बीड । प्रतिनिधी**

सध्या अवकाळी पाऊस पडत असल्याने कापूस पिकावरील शेंदरी बोंडअळीच्या नियंत्रणासाठी कापसाची लागवड ही अशा अवकाळी पावसावर करणे योग्य होणार नाही. कापसाची लागवड ही कोणत्याही परिस्थितीत १ जून पुर्वी करण्यात येऊ नये, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. १ जून पूर्वी लागवड केल्यास शेंदरी बोंडअळीचे जीवनचक्र खंडीत होत नाही व अळीचा प्रादुर्भाव अधिक वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे येणारे उत्पादन गुणवत्तेत कमी पडते तसेच पिक उत्पादनाचा खर्च अधिक येतो. अशा मालाला दरही कमी मिळतो त्यामुळे पूर्व हंगामी लागवड किफायतशीर राहत नाही. शेतक-यांनी १ जून पूर्वी कापसाची लागवड करु नये.

### सायकल चालवा, हृदयरोग टाळा,पायी चाला हृदय सांभाळा'

**बीड । प्रतिनिधी**

हृदयरोगासाठी सुप्रसिद्ध असलेल्या चंपावती मेडिकेयर हार्ट रुग्णालयाच्या वतीने शुक्रवारी (दि.१७) जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त भव्य रॅली काढण्यात आली होती. या रॅलीतील 'सायकल चालवा, हृदयरोग टाळा,पायी चाला हृदय सांभाळा'घोषणांनी बीड शहर दणाणून गेले होते. या रॅलीत डॉ. सुनील बोबडे, डॉ.राधाकिसन डाके,सुरेश पिंपळे यांच्यासह अधिपरिचारिक विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. बीडमध्ये खाजगी हॉस्पिटलच्या वतीने जागतिक उच्च रक्तदाबनिमित्त पहिल्यांदाच असा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

### आर्वी येथे वार्षिक हरिनाम सप्ताह

**बीड । प्रतिनिधी**



शिरुर तालुक्यातील आर्वी येथे मंगळवार २१ मे पासून वार्षिक अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात होणार आहे. यंदा सप्ताहाचे दुसरे वर्ष आहे. मत्स्येंद्रनाथ संस्थानचे महंत स्वामी जनार्दन महाराज यांच्या नेतृत्वात सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात ब्रह्मनाथ संस्थानचे महंत रामेश्वर शास्त्री यांची भागवत कथा होणार आहे.यंदा २१ मे ते २७ मे या काळात सप्ताह होणार आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आली आहे.

# घाटकोपरच्या दुर्घटनेतुन बीड नगरपालिका बोध घेणार का ?

## ● न्यायालयाच्या आदेशाचा अवमान, ● शपथपत्राद्वारे दिशाभूल कि पुन्हा येरे माझ्या मागल्या

**बीड । प्रतिनिधी**






मुंबईत घाटकोपर येथे अनाधिकृत होर्डिंग्ज कोसळुन १४ नागरीकांना जीव गमवावा लागला या दुर्घटनेनंतर बीड शहरातील अनाधिकृत होर्डींगचा मुद्दा चर्चेत आला असुन राज्याच्या नगरविकास विभागाने जिल्हाधिकारी व नगरपालिका मुख्याधिका-यांना तातडीने पत्र काढल्यानंतर निता अंधारे बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांना जाग आली असुन शहरातील स्वच्छता निरीक्षकांची बैठक घेत शहरातील ६ होर्डिंग्ज चालकांना नोटीसा बजावण्याचे आदेश दिले असुन कारवाईसाठी ८ जणांची नियुक्ती केल्याचे समजते.बीड शहरातील अधिकृत होर्डिंग्जची संख्या ३८ असल्याचा नगरपालिका दावा करत असली तरी प्रत्यक्षात १०० पेक्षा जास्त अनाधिकृत होर्डिंग्ज दिसून येत आहेत.शहरातील ईमारतीवर नगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता आणि कुठलेही स्ट्रक्चरल आडीट न करताच धोकादायक होर्डिंग्ज लावण्यात आले आहेत.सामाजिक कार्यकर्ते यांनी वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुद्धा केवळ २-४ होर्डिंग्ज काढुन कारवाई केल्याचे नाटक नगरपरिषद प्रशासन करत असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे त्यामुळे घाटकोपर येथील अनाधिकृत होर्डिंग्ज कोसळुन १४ जण मृत्युमुखी पडलेल्या दुर्घटनेनंतर तरी बीड नगरपरिषद प्रशासन बोध घेईल का?? कि नेहमी प्रमाणेच केवळ कारवाईचे नाटक करते हे पाहणं औत्सुक्याचे ठरेल तसेच या होर्डिंग्ज वरील जाहिरातीचा महसूल कोण गोळा करतं? या माध्यमातून शासनाचा महसूल बुडवुन कोणाची तिजोरी भरली जाते हा देखील संशोधनाचा विषय आहे असे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे

(उर्वरित पान २ वर)

# कौशल्य विकास उद्योजक्ता प्रशिक्षणासाठी अर्ज सादर करावेत

**बीड । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), जिल्हा कार्यालय बीड मार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील कुंटुबाचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नती व्हावी त्यांना रोजगार व स्वयं रोजगाराची साधने उपलब्ध व्हावी म्हणून समाजातील गरजूना आवश्यक त्या व्यवसायाचे प्रशिक्षण देवून त्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध होण्याकरिता प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. बीड जिल्हा कार्यालयास सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता एकुण ५०० प्रशिक्षणार्थींचे कौशल्य विकास उद्योजक्ता प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट मुख्यालयाकडून प्राप्त झालेले आहे.

बीड जिल्हातील ज्या संस्थेने कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षण पोर्टल वरिल नोंदणी केलेली आहे. अशा प्रशिक्षण संस्थेने ३१ मे २०२४ पर्यत शासनाच्या नियमानूसार सर्व आवश्यक कागदपत्रासह दोन प्रतित प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिलेली आहे. अटी, शर्ती / निकषा नुसार प्रस्ताव सादर करावेत. तसेच खालील अटी, शर्ती / निकष लागु राहतील. प्रशिक्षणार्थीने निवडलेल्या प्रशिक्षणाची फी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे करण्या दिनांक २० ऑगस्ट २०१९ मध्ये नमुद केलेल्या कोर्सेसची निवड प्रशिक्षणार्थीने करणे बंधनकारक राहिल. २)प्रशिक्षण संस्थेने निकर्षांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यानंतर शासनाच्या नियमानूसार आवश्यक त्या परिक्षेला बसविण्याची जबाबदारी संस्था चालकाची राहिल त्या शिवाय संस्थेची फी अदा केल्या जाणार नाही. प्रशिक्षण संस्थेला प्रशिक्षण कालावधी नुसार २० % ३०% ३०% २०% च्या प्रमाणात प्रशिक्षण फी अदा करण्यात येईल. संस्थेने घतखउ अंतर्गत प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीनां झचएत्र्झ अंतर्गत निवडलेल्या व्यवसायाचा कर्जाचा अर्ज सादर करण्यासाठी सुचित करावे. जिल्हा स्तरावर एका कोर्सेसाठी प्रशिक्षण देण्यासाठी एकाच प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यात येईल. प्रशिक्षणार्थीची बायोमॅट्रीक पध्दतीने व हजेरी पटावर स्वाक्षरीने हजेरी घेणे बंधनकारक राहिल. संस्थेने विद्यार्थी निहाय प्रमाणित केलेली हजेरी पाठविल्या शिवाय संबधीत प्रशिक्षण संस्थेची प्रशिक्षण फी अदा केली जाणार नाही.

प्रशिक्षण घेण्याची ईच्छा असलेल्या अर्जदारासाठी अटी / निकष खालील प्रमाणे आहे.

अर्जदार मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील असावा. अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी असावा. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे.अर्जदाराने यापुर्वी शासनाच्या / महामंडळाच्या कोणत्याही प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ३०००००/- या पेक्षा जास्त नसावे. एका कुंटुबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराने (उर्वरित पान २ वर)

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स सोशल फोरम बीड ची कार्यकारणी जाहीर

**बीड । प्रतिनिधी**



बीड येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स सोशल फोरम बीड सर्व सदस्याची बैठक एडवोकेट असीमा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झाली या बैठकीमध्ये नवीन पदाधिकाऱ्याची निवड सर्वांच्या मताने करण्यात आली सदरील कार्यकारणी पुढील एक वर्षासाठी कार्यरत राहील कार्यकारणी पुढील प्रमाणे आहे, अध्यक्ष एडवोकेट राहुल साळवे, उपाध्यक्ष एडवोकेट नाशेर पटेल, महासचिव एडवोकेट शिवाजी कांबळे ,सचिव एडवोकेट अजित सोनटक्के ,कार्याध्यक्ष धीरज कुमार कांबळे ,कोषाध्यक्ष एडवोकेट पंकज रायभोळे, सहसचिव एडवोकेट, सुनील वडमारे कार्यकारी सदस्य एडवोकेट रामानंद कोरडे, प्रसिद्ध प्रमुख योगेश शिंदे ,महिला प्रतिनिधी एडवोकेट रविना सवाई नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन ज्येष्ठ विधिज्ञ एडवोकेट वसंत वडमारे ,एडवोकेट आर डी गायकवाड ,एडवोकेट विश्वनाथ मगर ,एडवोकेट सिद्धार्थ शिंदे, एडवोकेट ओ.डी गायकवाड एडवोकेट सुरेश वडमारे,अँड .अविनाश गडगे,ॲड . सतिष सोनवणे, अशोक शेटे ,एडवोकेट भगवान कांडेकर ,एडवोकेट राजन साळवी ,विद्या गायकवाड ,एडवोकेट छाया वाघमारे ,संगीता वीर ,अनिता चक्रे,अँड. सुनिल साळवे, ॲड महेंद्र जाधव, अँड अशोक वाघमारे,अँड. शहादेव भडारी,अँड. राहुल वडमारे,अँड. सुरेश साळवे, ॲड. अविनाश मगर, अदिनी केले.

# युवकांनी सलोखा , बंधुत्व संबंध जोपासण्याची गरज : ॲड. राऊत

## समाज माध्यमांवर विषमतेला थारा देऊ नका समता परिषदेचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**



मागच्या काही दिवसांपुर्वी लोकसभा निवडणूक पार पडलेली आहे निवडणूक झाल्यानंतर देखील अनेक नव - युवक समाज माध्यमांवर अक्षपार्य पोस्ट , एखाद्या समाजावर खालच्या पातळीवर मजकूर करताना दिसत आहेत. असे केल्याने समाजा समाजात पोकळी निर्माण होत आहे. अशा पद्धतीच्या आक्षेपार्य पोस्ट समाज माध्यमांवर कोणी करू नये असे आवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड.सुभाष (भाऊ) राऊत यांनी केले आहे.

बीड लोकसभा निवडणुकीचे मतदान हे एकुण सात टप्प्यांपैकी चौथ्या टप्प्यात (१३) मे रोजी संपन्न झाले. पूर्ण महाराष्ट्राचे लक्ष यावेळच्या बीड लोकसभा निवडणुकीकडे लागलेले पहायला मिळाले होते. या मागचे कारण पहायचे झाले तर मतदानाच्या काही काळापूर्वी झालेल्या संघर्षामुळे ही निवडणूक जातीय मुद्द्यांवर होण्याचे संकेत स्पष्ट निर्माण झाले होते. त्यामुळे यावेळची निवडणुक कसरतीची ठरणार असल्याचे चित्र तयार झालेले होते. या निवडणुकी वेळी पक्षाचा प्रचार असो की, उमेदवाराचा हा जास्त प्रमाणात समाज माध्यमांवर (उर्वरित पान २ वर)






# गौण खनिज अधिकारी माधव काळे यांचा पदभार काढण्याचा विभागीय आयुक्तांचा आदेश

## सामाजिक कार्यकर्ते अशोक कातखडे यांच्या लढ्याला यश !

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी असणारे जिल्हाधिकारी कार्यालय हे अतिशय महत्त्वाचे आणि जबाबदारीचे कार्यालय हे अतिशय महत्त्वाचे आणि जबाबदारीचे कार्यालय समजले जाते. जिल्हाधिकारी कार्यालयातूनच मोठ्या प्रमाणात जिल्ह्याच्या नियोजनाचे आयोजनाचे व पूर्ण विभागाचे नियंत्रण कक्ष असतात. व तेथीलच अधिकारी हे या जिल्ह्याचा कारभार पाहणारे असतात. यांच्या कारभारावर शासनाचे लक्ष असतं आणि इतरत्र कार्यालय व जनतेच्या दुवा म्हणून या कार्यालयाकडे मोठ्या प्रमाणात बघितले जाते. तेथील कार्यालयातील अधिकारी हा उच्चशिक्षित व जबाबदार नियुक्त अधिकारी असतो.आणि अशाच कार्यालयातील जबाबदार अधिकारी जर चुका करून आपल्या बुद्धीचा गैरवापर करून शासनाच्या नियमाची पायमल्ली करत असतील त्यावेळेस त्याला न्यायालयीन दनका बसणे सहाजिकच आहे. आणि तोच प्रकार बीड जिल्ह्यातील या जबाबदार शासन सेवेत कार्यरत असणारे जबाबदार अधिकारी व कर्मचारी व्यक्तींना मा. लोकायुक्त मुंबई व विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांनी दनका दिला आहे.

गौण खनिज ही राष्ट्रीय संपत्ती आहे. तीचे रक्षण करणे हे शासन नियुक्त आसणारे जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध गौण खनिज उत्खनन सुरू आहे. महाराष्ट्र शासनाचा कोट्यावधी रुपये महसुल बुडविण्यात येत आहे. तसेच पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हाणि होत आहे. परंतु रक्षकच जर भक्षक आसतील तर न्याय मागायचा कोणाकडे हाच प्रश्न अनुत्तरित आहे. परंतू शासन सेवेत कार्यरत आसणारे जबाबदार जिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांनी पदाचा गैरवापर करून कर्तव्यात कसूर करून माधव काळे यांची गौण खनिज खनिकर्म अधिकारी म्हणून दि.०५/०९/२०२३ रोजी नियुक्त केली . वास्तविक पहाता माधव काळे नायब तहसीलदार वर्ग २ यांच्याविरुद्ध दि. १७/०६२०१७ रोजी गुरनं ४४०/२०१७ शिवाजीनगर पोलीस ठाणे बीड येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच त्यांच्याविरूद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे. याबाबत अशोक कातखडे सामाजिक कार्यकर्त यांनी सर्व पुराव्यासह दि. १९/१२/२०२३ रोजी मा. लोकायुक्त मुंबई यांना नोंदणीकृत डाकेने तक्रार दाखल केली आहे. सदरिल तक्रारीची मा. लोकायुक्त मुंबई यांनी गंभीर दाखल घेऊन दि.०७/०३/२०२४ रोजी मा. विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांना एक महिन्यात चौकशी करून अहवाल पाठविण्या बाबत पत्र पाठवले. त्यानंतर

(उर्वरित पान २ वर)

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com